# २६. पतंग

• ऐका. वाचा.

पतंग उडवू चला,
गड्यांनो, पतंग उडवू चला.

रंग ढगांवर मावळतीचा,
लाल पिवळसर किती मजेचा,
झुळझुळ वारा नदीकाठचा,
बाजुस डोंगरमळा.

करू चला सुरवात बरोबर,
सोडा सोडा रीळ भराभर,
पतंग चढवा हे वाऱ्यावर,
ढगांस भेटायला.

मउमउ वाळुत पाय रोवुनी,
देऊ झटका दोरा ओढुनि,
पतंग जातिल वर वर चढुनी,
पंख नको त्याजला.

जशी पाखरे आभाळात,
पंख पसरुनी तरंगतात,
दिसतिल तैसे पतंग रंगित,
खेळ किती चांगला !

**– अ. ज्ञा. पुराणिक**



**शब्दार्थ :** **त्याजला** – त्याला. **आभाळ** – आकाश. **तरंगणे** – हवेत उडणे.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) सूर्य मावळण्याच्या वेळेस ढगांवर कोणता रंग दिसतो ?
(आ) पतंग कोणासारखे तरंगतात ?

**प्र. २. विरुद्ध अर्थाचे शब्द माहीत करून घ्या. लिहा.**

(अ) चढणे ×	(ई) मऊ ×
(आ) ओढणे ×	(उ) चांगला ×
(इ) मावळणे ×	(ऊ) भराभर ×

**प्र. ३. खालील शब्दांना 'सर' शब्द जोडून नवीन शब्द तयार करा व लिहा.**

**उदा.,** पिवळा - पिवळसर.

(अ) काळा (आ) निळा (इ) लाल

**प्र. ४. मोकळ्या जागी कवितेतील योग्य शब्द लिहा व या कडव्याचा अर्थ समजून घ्या.**

जशी ............ आभाळात,
............ पसरुनी तरंगतात,
दिसतिल तैसे ............ रंगित,
खेळ किती ............!

**प्र. ५. तुम्हांला आवडणाऱ्या पाच खेळांची नावे सांगा.**

**प्र. ६. हे शब्द असेच लिहा.**

झुळझुळ, रीळ, पिवळसर, पतंग, रंगित.

**प्र. ७. खालील शब्द वाचा. असे आणखी शब्द लिहा.**

(अ) पळापळ, रडारड, पडापड.
(आ) मऊमऊ, वरवर, कळकळ.
(इ) रडतखडत, हसतखेळत, वाजतगाजत.

**प्र. ८. समान अक्षराने शेवट होणारे कवितेतील शब्द लिहा.**

(अ) मावळतीचा -	(इ) रोवुनी -
(आ) बरोबर -	(ई) आभाळात -

AXHSIV

**प्र. ९. गोलातील शब्द जोडून वाक्ये बनवा.**




**उदा.,** चेंडू झेलणे.

**वाक्ये :** (१) मी चेंडू झेलतो.
(२) शिवानी चेंडू झेलते.

• **वाचा. लक्षात ठेवा.**

घराच्या छतावर उभे राहून पतंग उडवू नका. मोकळ्या मैदानात पतंग उडवा. काटलेला पतंग पकडण्यासाठी रस्त्यावर धावू नका. अवघड ठिकाणी चढू नका.